# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २७/०८/२०२३ (रविवार)

---

## खुन

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— अंतर्गत परसोडी दिक्षीत ८ किमी उत्तर. यातील मृतक हा दि. २५/०८/२३ चे सकाळी ०७.०० वा पासुन घराबाहेर गेला होता, तो दि. २६/०८/२३ चे सकाळी ६.३० वा दरम्यान, यातील फिर्यादी हा भारसिंगी वरुन परत परसोडी येथे आले असता, तेव्हा गावातील देवीदास सोनवाने यांनी फिर्यादिला सांगीतले की, तो सकाळी गावाला लागुन असलेल्या पादंन रस्त्याने जात असता, उमेश खंडार हा उबड्या स्थीतीत झोपला दिसला असे सांगीतल्यावरुन फिर्यादिने लगेच उमेश खंडार यांच्या पत्नी सुनिता खंडार हिला सांबत घेवुन तसेच गावातील लोक मिळुन घटनास्थळी जावुन मृतक ला बघीतले असता तो दगडावर उबड्या स्थीतीत दिसला, तेव्हा मृतकच्या पत्नी सुनिता खंडार हिने मृतकला दगडावरुन बाजुला केले असता तो मरण पावलेला दिसला मृतकाच्या शरीरावर डोक्याला व ईतर भागाला जखम झालेली दिसली. कोणीतरी अज्ञात ईसमाने अज्ञात कारणावरुन मृतकास दगडाने मारुन तसेच शरीरावर हातपायावर मारुन जिवानीशी ठार मारले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— निखील दिलीपराव भहे वय ३३ वर्ष रा. परसोडी दिक्षीत ता.नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०२ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी मोन.८९७५७५५९६९ हे करीत आहे.

## चोरी

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— अंतर्गत मौजा राजोला ता कुही २५ किमी प. येथे यातील फिर्यादी हे कामाकरीता रस्सा आणण्यासाठी छिंदवाडा येथे गेले व परत येताच राजोला समाज भवनात नलजिवन मिशन अंतर्गत केलेल्या पाईप योजने करिता खुल्या जागेतील आवारात ठेवण्यात आलेले सुपर प्लेक्स कंपनीचे अंदाजे २० फुट पर नग ४६० प्रमाणे ८० पाईप किमती ३६,८००/रु चा माल दिसुन आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने दिनांक २६.०७.२३ ते दिनांक ३०.७.२३ चे ०९.०० वा दरम्यान चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे नवलकिशोर दास वय ४० वर्ष रा चंदनगाव मध्यप्रदेश यांचे रिपोर्टवरून पोस्टे वेलतुर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादविचा गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना/२०१९ रंगारी मो.न ९८०८३४७१३६ हे करीत आहे.

## घरफोडी

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— अंतर्गत मौजा वार्ड क्र ०२ चणकापुर जगदीश मेश्राम यांचा घरी ०४ किमी पश्चिम, येथे यातील फिर्यादी व फिर्यादीची पत्नी वाढदिवसाचे कार्यक्रमात गेले होते. कार्यक्रम झाल्यानंतर फिर्यादी व त्याची पत्नी मुलासह घरी परत आले असता फिर्यादीला घरासमोरील दाराचे कुलुप तुटुन बाजुला पडलेले दिसले, घराचे दार उघडुन आत मध्ये जाउन पाहिले असता घरातील सर्व सामान हे अस्तव्यस्त पडलेले होते तसेच बेडरूम मध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटाचे दार उघडे असुन कपाट मधील लॉकर हे तुटलेले दिसले व त्या लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे, चांदीचे दागिने व पैसे हे दिसुन आले नाही. ते खालील प्रमाणे १) एक सोन्याचे अगंठी वजन २९ ग्रम ७८०००/— रू २) १ सोन्याचे गोप वजन १५ ग्राम ४०५००/— रू. ३) १ सोन्याचे पोत वनज २५ ग्राम ९७५००/— रू ४) २ सोन्याचे लॉकेट वजन ५.५ ग्राम २७५००/— रू ५) १० सोन्याचे मनी वजन १ ग्राम २७००/— रू ६) १ जोडी कानातले रिंग वजन २ ग्राम ५४००/— रू ७) १ जोड सोन्याचे झुमके वजन ४ ग्राम १०८००/— रू ८) १ जोड सोन्याचे बि—या वजन ३ ग्राम ८१००/— रू ९) १ चांदिचा गोप वजन १५ ग्राम २०००/— रू. १०) ४ जोड चांदिच्या तोरडया वनज २१५ ग्राम १६४६९/— रू ११) नगदी १४०००/— रू नगदी असा एकुण ३,०२,९६९/— रू चा माल कोणीतरी अज्ञात इसमाने दिनांक २५.०८.२३ चे १९.३० ते दिनांक २६.८.२३ चे ०८.०० वा दरम्यान चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कृष्णा गणपत सिंघनापुरे वय ६१ वर्षे रा.वार्ड क्र ०२ यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम ४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो उपनि मिश्रा मो.न.९९२३६९४७०९ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन मौदा** :— अंतर्गत भंडारा ते नागपुर हायवे क्र ५३ वडोदा शिवार कामठी पश्चिम १० किमी. येथे फिर्यादी मृतक नामे हा आपल्या ताब्यातील चौदा चक्का ट्रक क्र डब्लु बी १२ एफ ३४७७ चालक निलेश बोरई रा लोकनाथ सरानि जि बोरदमान राज्य पश्चिम बंगाल वरून मुबई जानेकरीता माल लोड केला होता, भंडारा ते नागुपर वडोदा शिवाराजवळ ओव्हर ब्रिज च्या समोर सोळा चक्का ट्रक क्र एम एच ३७ टी २६४२ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन लापरवाहीने उजव्या साइडला डिवायडरला लागुन स्पिड लेथ वर उभे केले असता, आपल्या ट्रकचा पार्कींग लाइट किंवा कोनताही व्यक्ती ट्रक च्या मागे उभे केले नाही, येणा—या जाणा—रा वाहनाला त्रास होईल अश्या स्थितीत गाडी उभी केली असता, चौदा चक्का डब्लु बी १२ एफ ३४७७ चालक निलेश बोरई हयाची ट्रकवर धडक लागली ज्यामुळे चालक नामे— निलेश बोरई हा जखमी झाला. व उपचारादरम्यान वैदयकीय अधिकारी यांनी तपासुन मृत घोषित केले

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कुमार श्री योमदेव यादव वय २२ वर्ष रा माधुपुर पहाडपुर नवादा राज्य बिहार मौदा नागपुर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे मौदा येथे कलम ३०४ (अ), २८३ भादवि चा गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि पिंपळर मो न ८४२१९५६०६६ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**